स. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ९६२

# बालक.

वा. क्र. १८२२




REFBK-0001822
REFBK-0001822

वा. ज. कुंटे.

# बालक.

रचणार

वामन जनार्दन कुंटे.



किंमत सहा आणे.

१९२०

REFBK-0001822
REFBK-0001822
मराठी ग्रंथ संग्रहालय
९८२२

पुणें येथें
आर्यभूषण छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें
व
रा. वामन जनार्दन कुंटे यांनीं पुणें येथें प्रसिद्ध केलें.

# दोन शब्द.

‘ प्रौढत्वीं निज शैशवास जपणें बाणा कवीचा असे ’

या केशवसुतांच्या उक्तीची यथार्थता डॉ. रवींद्रनाथ टागोर यांचें ‘शिशु’ हें काव्य वाचल्यावर पटल्याशिवाय राहणार नाहीं. ‘ अज्ञाताच्या तीरा ’ पर्यंत पोहोंचणारी त्यांची विशाल बुद्धिमत्ता बालकाच्या अंतःकरणांत विहार करण्याइतकी सूक्ष्म होऊं शकते हें पाहून मन थक्क होऊन जातें. गीतांजलीसारख्या गहन विषयांत दंग असलेलें त्यांचें अंतःकरण मुलांच्या ‘ काडी-मातिच्या’ खेळांतही रंगून जातें. बालकांच्या मनोविकारांचें प्रत्यक्ष शब्दचित्र रेखाटण्याचें त्यांचें सामर्थ्य अद्भुत आहे.

हें काव्य बालकांविषयींच्या, बालकास उद्देशून व एखाद्या गोष्टीविषयीं बालकांच्या अंतःकरणांत कशा प्रकारचे विकार उत्पन्न होतात हें दर्शविणाऱ्या, अशा तीन प्रकारच्या स्फुटलेखांचा संग्रह आहे. त्यांतील कांहीं कल्पना पद्यरूपानें मराठींत आणण्याचा प्रयत्न केला आहे. तो कितपत साधला आहे हें पाहण्याचें काम रसिकांचें आहे. माझ्या या प्रयत्नानें मूळ काव्य वाचण्याविषयीं वाचकांत जिज्ञासा उत्पन्न झाली. म्हणजे माझ्या श्रमाचें सार्थक झालें असेंच मला वाटणार आहे.

**वामन जनार्दन कुंटे.**

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| माझें गाणें ... ... ... ... | १ |
| बद्नामी ... ... ... ... ... | २ |
| न्यायाधीश ... ... ... ... | ३ |
| ज्योतिषी ... ... ... ... ... | ४ |
| खेळणीं ... ... ... ... ... | ६ |
| कोठून आलों ... ... ... ... | ७ |
| प्रयाण ... ... ... ... ... | ९ |
| लहानाचा मोठा ... ... ... ... | ११ |
| गेलीस सोडुनी ताई ... ... ... ... | १३ |
| मेघ आणि तरंग ... ... ... ... | १४ |
| सहानुभूति ... ... ... ... | १६ |
| ग्रंथकार ... ... ... ... ... | १७ |
| कोठून ... ... ... ... ... | १८ |
| जाईचीं फुलें ... ... ... ... | १९ |
| दुष्ट डाकवाला ... ... ... ... | २० |
| पाऊस ... ... ... ... ... | २२ |
| भेट ... ... ... ... ... | २४ |
| शाहणा ... ... ... ... ... | २५ |
| चाफ्याचें फूल ... ... ... ... | २६ |
| आशीर्वाद ... ... ... ... | २८ |

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९८२२

# माझें गाणें.

( चालः-चंद्रकांत रायाची. )

माझ्या गाण्यांतून नाद जे हवेंत उठतील,
वेढितील ते प्रेमळ बाहूपरि तुजला बाळ !
माझें गाणें तुझ्या मस्तकीं ठेउनिया हात,
प्रेमाचें स्वर्गीय तुला तें आशीर्वच देत.

एकांतीं तूं बसतां तुझिया जवळी बैसेल,
कानीं तव तें अनेक सुंदर गोष्टी सांगेल !
जातां तूं गर्दींत तें तुझा रक्षक होईल,
जन-संमर्दापासून तुला अलिप्त राखील.
तुझ्या स्वप्नसृष्टींत होउनी पंख तुझे छान
अज्ञाताच्या तीरीं ठेविल तुजला नेऊन !

त्वन्मार्गीं आडवें निशेचें तम जरि येईल,
वाटाड्या ध्रुवनक्षत्रापरि तव तें होईल.
डोळ्यांच्या बाहुल्यांत तुझिया जाउनि बैसेल,
पदार्थमात्राच्या अंतरिं तव दृष्टी भेदील.
आणिक माझा स्वर मृत्यूनें होइल जइं शांत,
तें तुझिया बोलेल सदाही सजीव हृदयांत !

# बदनामी.

( चाल:-भूपती खरे ते. )

डोळ्यांत आसवें काय म्हणुनि तव बाळा !
हें बरें नव्हे उगि रागे भरणें तुजला.
शाइनें भरलिं तव बोटें मुख, लिहितांनां
घाणेरा म्हणुनी लोक तुला वदती ना !
माखलें जयें निज वदन शाइनें बाळा !
मलिन का बोलतिल चद त्या पूर्णेंदूला ?

शोधुनी काढुनी बारिकही तव दोष
तुज रागे भरण्या भारी त्यांनां हौस,
खेळतां फाटलें वस्त्र तुझें हें बाळा !
म्हणुनिया गबाळ्या बोलतात का तुजला ?
फाडुनी अंबरा उषा श्रावणामधली
हांसते, बोलतिल काय तिला त्या काळीं ?

तूं नको त्यांकडे लक्ष देउं मम बाळा !
करितील याद ते गणुनी तव खोडीला.
गोड गोड खाया सदा तुला आवडतें
म्हणुनि का अधाशी बोलतात तुजला ते ?
मग तूंहि गोड जर आम्हांला आवडशी
धिक् तया ! ठेवितिल नांवें आम्हां कैशी !

# न्यायाधीश.

( चालः– लक्ष्मण पडतां धरणीला. )

बाळानें खोडी केली
कशी सांग मज सारी ही,
ठाउक मज त्याचे दोष
न धरी किंतु मनीं कांहीं;
तो शाहणा गोजिरवाणा
म्हणुनी प्रीति न मी करिते
तो माझा आहे इतुकें
कारण मजला गे ! पुरतें.
गुण आणिक अवगुण त्याचें
काट्यानें गे ! तोलुनिया,
मत्प्रीती त्याचे वरची
येइल का तुज मापाया ?
मारित मी जेव्हां त्या तो
मद्देहाहुनि अन्य नसे,
तन्नयना अणितां पाणी
पाणि मन्मनाचें होतें.

दिंडीः– मीच मारिन रागेंहि मी भरेन
एकलीचा तो हक्क असे जाण,
मन प्रीतीनें प्रथम पाझरावें
मगचि माराया कर पुढें करावे.

# ज्योतिषी.

( चाल:-घेउनि हृदयाशीं सुतेला स्थित मी दाराशीं. )

‘ पुनवेचा चांद,
निशीं जइं अडकुनिया बसला
कदंबशाखांत,
धरूं शके कोणि न का त्याला ? ’
इतुकें मी वदतां
बोलला दादा हांसोनी,
‘ खुळी न तुज ऐशी
पाहिली मी दुसरी कोणी !
चंद्र किती आहे
आपुल्या पासुनिया दूर !
कसा धरायाला,
तयाला शकेल कोण नर ? ’
मी म्हटलें ‘ दादा !
खुळा रे ! तूंच खरा पाही
खिडकींतुनि पाहीं,
खेळतां अपणां जइं आई,
तिजला बहु दूर
बोलशिल का तूं साचार ? ’

तरिहि वदे दादा,
‘ ताइ गे तूं वेडी पोर !
परि तें जाऊं दे
धराया जोगें त्या मोटें
मिळेल अपणांला,
सांग तरि जाळें तें कोटें ?’
मी म्हटलें ‘ सहजी
आपुल्या धरशिल तूं हातें.’
दादा हंसुनि वदे,
‘ तुझ्यासम मूर्ख न कोणी तें.
येइल जर जवळी
नभांतुनि इंदु इथें आतां,
कळेल मग तुजला
केवढा आहे तो मोठा !’
मी म्हटलें ‘ दादा !
हेंच का शिकसी शाळेंत !
अपुणां चुंबाया
आइ मुख जवळी आणीत,
काय तुला तेव्हां,
वाटतें तें मोठें फार ?’
तरिहि वदे दादा,
‘ ताइ गे ! तूं वेडी पोर !’

---

# खेळणीं.

(चाल:- चंद्रकांत रायाची.)

सकाळपासुनि घेउनि काडी तुटकी हातांत,
बाळा ! खेळत बसलास तूं हांसत धूळींत.
तुला तसें खेळतां पाहुनी हंसूं मला आलें
तास तास मी हिशेब जुळवित बसलों ज्या वेळें.
तूंही पाहुनि मला असा रे हांसत म्हणशील,
'रम्य सकाळीं खेळायाला हा कसला खेळ ?'
काडिमातिनें खेळायाचें विसरुनिया गेलों,
सोन्याचीं बिनमोल खेळणीं शोधित मी बसलों.
जें करिं ये तव, त्यांतुनि निघती आनंदी खेळ,
न मिळे तें मिळविण्या खर्चितों श्रम आणिक वेळ.
दुबळ्या नावेंतुनि तरुं बघतों काम-समुद्राला,
विसरुनि जातों मीही खेळत आहें या खेळा.



काव्य नं. ६२५

# कोठुनि आलों.

( चालः—घनःशाम सुंदरा. )

' कोठुनि आलों ! सांपडलों तुज कोठें गे ? ' बोललें
बाळ, आइनें स्फुंदत हांसत हृदयाशीं कवळिलें.
' हृदयिं कामना-रूपें लपला होतासी मम ' वदे
' तेथुनि येसी बाळपणींच्या बाहुलींत रे ! मुदें.
मातीच्या देवांच्या मूर्ती प्रतिदिवशीं बनवितां
करीत होते मोडित होते तुलाच मी कितिकदा.

' केली होती तुझी बालका ! देवघरीं स्थापना,
देव पूजितां करीत होते तुझ्याच मी पूजना.
माझ्या जीवांतिल आशेच्या उद्यानीं किति दिन,
वाढलास तूं सुखें सेवुनी प्रेमाचें जीवन.
परम परात्पर अजरामर ती अमुची गृहदेवता,
निज अंकीं पोशीत युगांच्या युगें तुला तत्वतां.

' हृदयकळी मम उमलत होती यौवनांत जेधवा
सुवासापरी तिच्याभोंवती दरवळसी तेधवा;
तुझी मधुर मृदुलता माझिया खुलली अंगावरी
बालरवीच्या उदयीं पूर्वा जैशी कांती वरी.

प्रभात-प्रभा परम मंगला विश्वाची लाडकी
तिच्या सवें रे! जन्मलास तूं जुळा तिचा भाउ कीं
जगज्जीवन-प्रवाहासवें चाललास वाहत
माझ्या आतुर हृदय-प्रांतीं लागलास शेवट.

मुखाकडे पाहतां तुझ्या रे! गुंगुनि जातें मन
तूं सकलांचें रत्न जाहलें माझें कैसें पण ?
कवण जादुनें विश्वनिधी हा माझ्या दुबळ्या करीं
आला, जावो कधीं न म्हणुनी हृदयीं दृढ मी धरी.



# प्रयाण.

काव्य नं. ८२५

( चालः—बाळा ज़ो जो रे. )

निरोप दे आई ! जायाची वेळ जाहली पाही
तिमिर जई वेगें शांत उषः-काळीं वितळूं लागे,
तई अंथरुणांत उचलाया घालशील तूं हात,
'बाळ तिथें नाहीं' सांगोनी नभांत उडुनी जाई !

आतां मी आई प्रत्यक्ष दिसणार तुला नाहीं
तरि तुज भेटेन सृष्टीचीं नवरूपें घेऊन.
झुळूक होऊन वाऱ्याची तुजला कुरवाळीन;
अंग धुवायाला जाशील आई ! जेव्हां नदिला,
लहरी होऊन चुंबीन पुनः पुन्हा तव वदन;
वादळ निशिं होत तरुपर्णीं पाउस जों टपटपत,
तई बिछान्यांत पडलीस शोकानें तळमळत,
कुजबुजणें माझें तव कर्णीं येइल शांती दे जें.

बिजली चकमकत गगनांत जाळींतुन तुज दिसत
तिच्या प्रभेवरुनी स्मित माझें तुजजवळी ये जननी
माझी आठवण होऊन झोंप तुला निशिं ये न,
ताऱ्यांतुन आई निजवाया तुज, गाइन अंगाई.
इंदुकरांतून येऊन हळुंच झरोक्यांतून
घेई तव हृदयीं विश्रांती निजशि सुखे जइं आई !

आली दिपवाळी   खेळाया   बाळें जमलीं मेळीं
ताई त्या वेळ   मजवरुनी   ओव्या किति गाईल.
मिसळूनी आई   त्या गानीं   स्फुरेन तुझिया हृदयीं.
खाऊ आणील   आत्या ती   पुसेल ' कोठें बाळ ? '
कंठ तुझा आला   दाटून   बोलशील मग तिजला.
' मन्नयनीं भरला   देहींही   आत्माची मम झाला. '



# ल्हानाचा मोठा.

काव्य

( चाल: आनंदी आनंद गड. )

बालक मी आहे म्हणुन  मज वदती सारे छोटा
बाबांच्याएवढा जई  होइन मी तेव्हां मोठा ! ध्रु०

गुरुजी येउनि म्हणतील  ' उशिर किती झाला बाळ !
पुस्तक पाटी घेवोनी  ये, अभ्यासा लाग झणीं '
मी बोले ' आतां मजला  नको धडे ते शिकण्याला,
आतां मी बाबाइतुका  झालों मोठा नाहीं का ? '
विस्मित होतिल
मनांत म्हणतिल
' सोडुनि देइल
पुस्तक जर त्या गमे अतां  कारण झाला हा मोठा. '

करुनीया पोषाक स्वतां  जत्रेच्या गांदत जातां
मामा धांवत येतील  म्हणातिल ' चुकशिल तूं बाळ,
हात धरुनि चल ' बोलेन  ' एकलाच मी जाइन
आतां मी बाबाइतुका  झालों मोठा नाहीं का ? '
विस्मित होतिल
मनांत म्हणतिल
' खरेंच जाइल,
गमेल त्या तिकडे आतां  कारण झाला हा मोठा '.

पेटी मी उघडुनी स्वतां   बाईला पैसे देतां
अंग धुवोनी नदिवरुनी   येतां वदेल मज जननी
'करिशी काय तिथें बाळा ?'   'पगार देतों बाईला
आतां मी बाबाइतुका   झालों मोठा नाहीं का ?'
विस्मित होइल
मनीं म्हणेल
'तया गमेल
तसा खर्च हा करिल अतां   कारण झाला हा मोठा.'

गांवाहुनि बाबा येतां   आणितील माझ्याकरितां,
खेळ आणि कपडे छान   समजुनि अजुनी मज सान.
मी बोलेन 'नकोत मला   द्या सारे ते दादाला,
मी तुमच्याएवढा अतां   झालों नाहीं का मोठा ?'
विस्मित होतिल
मनांत म्हणतिल
'खरेंच घेइल
गमे तसा पोषाक अतां   कारण झाला हा मोठा.'

# गेलीस सोडुनी ताई.

( चाल:—नृप ममता रामावरती. )

गेलीस सोडुनी ताई  परत ये भेट झणिं देई ! ध्रु०

गेलीस तेधवा होती  काळोखाची बघ रजनीं,
आतांहि तशीच निशा हे  बोलावी तुजला म्हणुनी !
निद्रिस्त सकल जग झालें  तारका चमकती गगनीं.
सत्वरी हळुच ये तरी
लाडके ताइ, लाडके ताई'
कळणार कुणाला नाहीं.

गेलीस तेधवां नुकती  नव वसंत-लक्ष्मी खुलली,
पालवी तरुस नव फुटली  कुसुमिता वसुमती झाली;
आतां हि तोच ऋतु म्हणुनी  बोलावी तुज या वेळीं,
खेळतां जमवुनी कुसुमें  उधळितों मुलें भंवतालीं !
त्यांतील एक जर फूल
घेशि तूं ताइ  घेशि तूं ताई,
रागावेल न कोणीही.

तेव्हां जे खेळत होते  ते दंग त्यांत अजुनीहीं:
आयुष्य वाहतें ऐसें  किति, तयास गणती नाहीं.
ऐकून तयांच्या बोला  लाडके ! तुला बोलावी
भेटाया उत्सुक तुजला  प्रणयदेवता तव आई.
गे तिला, मुका त्वां दिला
गमे तर ताइ, गमे तर ताई !
हेवा नच कोणालाही.


# मेघ आणि तरंग.

( चालः—घनःश्याम सुंदरा श्रीधरा. )

मेघांतिल गंधर्व आइ गे ! मजला बोलाविती.
' क्रीडन-रंगीं दंग अम्हि सदा नाहीं त्याला मिती,
सुवर्ण-कांती उषा, चंद्रमा धवल. खेळणीं अशीं
अमुचिं.' ' कसा पण येऊं उडुनी तेथें सांगा मशीं ? '
' ये धरणीच्या कडेस अपुलें हात उंच वर करी
वाहुनि नेऊं तुला आमुच्यामधें मुला सत्वरी ! '
' आई माझी उत्कंठेनें वाट पाहते घरीं,
कसा सोडुनी येउं तिला मी ? ' हांसत जाती दुरी.
नको खेळ ते याहुनि सुंदर खेळ मला ठाउका
वितान-नीलाकाशीं बनलों श्याम मेघ मी निका
तूं हो जननी शरच्चंद्र तुज करें सुदृढ वेढिन
आनंदाला तुला न त्या मी धन्य जगीं होइन.

सागरलहरींतल्या बोलती मजला जलदेवता,
' गायन नर्तन असें चाललें अमुचें रे सर्वदा !
कुठें चाललों अनंतामधें ठाउक आम्हां नसे '
' तुमच्याजवळी यावयास पण मिळेल मजला कसें ? '

‘ ये सिंधूच्या तीरावरती नयन झांकुनी धरी
वाहुनि नेऊं तुला आमुच्यामधें मुला सत्वरी !’
‘ करमत नाहीं माझेवांचुनि आईला क्षणभरीं
कसा सोडुनी येउं तिला मी ?’ हांसत जाती दुरी.
नको खेळ ते त्याहुनि सुंदर खेळ ठाउका मला
झालों मी बघ तरंग रम्य प्रेमसागरांतला
तीर होइ तूं अंकावर तव उड्या किती घेइन
आनंदाला तुला न त्या मी धन्य जगीं होइन.




# सहानुभूति.

( चालः— उद्धवा शांतवन. )

वागशील कशि मजसंगें   मी नसतों जर तव बाळ ? ध्रु०

समज मी मनीचें पोर   खायास तुझ्या पानांत
आलों, तर झिडकरोनी   मारशील का मज लाथ ?
' कारटें तोंड घालून '   म्हणशील ' अन्न नाशीत ' ?
येणार जवळि जा नाहीं,
बोलावशील तेव्हांही,
भरवूं न तुला मी देई,
आर्जवें जरिहि करशील.

स्वच्छंदें नभिं उडणारा   झालों जर पोपट छान !
घालशील पंजरिं धरुनी   मी उडूं नयेच म्हणून ?
' कारटें त्रास किति देई ?   म्हणशील ' पंख फडफडुन ' ?
मी उडुनि दूर वनिं जाई
तुजकडे न येई आई !
तुज कडे न घेऊं देई.
आर्जवें जरिहि करशील.



[stamp]

# ग्रंथकार.

( चालः-साकी. )

बोलतेस तूं आई ! बाबा लिहिती ग्रंथ अनेक,
काय लिहीती मला समजतें नाहीं कांहीं एक !
वाचुनि तुजला संध्याकाळीं दाखवीत ते होते,
खरेंच कां गे त्यांतिल तुजला कांहिं तरी समजे तें ?
राजा राणी भुतें अशांच्या गोष्टि सांगसी आई !
तशा लिहाया बाबांनां गे ! येति न काय कधींही ?
अपुल्या आईपासुनि त्यांनीं ऐकिल्या न कां माते ?
कीं मोठे होतांच सर्वही विसरुनिया गेले ते ?
उशीर होतां आंघोळीला लिहितांना त्यांनां गे !
शंभर वेळां बोलवावया तुजला जावें लागे.
भात चालला निवून तरिही त्याची शुद्धी नाहीं !
पुस्तक लिहिण्याचा हा त्यांचा खेळच आहे काई ?
जरा कुठें मी तिकडे गेलों तर ‘ फिर द्वाडा मागे’-
म्हणशी, करितां जराहि दंगा मजला भरशी रागे,
‘ असावयाचें कामामध्यें न कळे तुजला काय ? ’
लिहिणें लिहिणें एकसारखें गंमत ही तरि काय !
लिहिलें बाबाऐसें मी जर कोपतेस अ-आ-ई
शब्दही न परि बाबा लिहितां बोलतेस तूं आई.
ढीग रोज नासतात कागद त्याची क्षिति तुज नाहीं.
नाव कराया कपटा घेतां ‘ खस्याळ झाला बाई ’-
म्हणशी, काळ्या रेघांनीं किति चितारले हे पाहीं
कागद बघुनी काय वाटतें तुजला, समजत नाहीं,

# कोठून.

( चालः– वधू ही वल्ली. )

नीज कोठोनी   आली ही बालक–नयनीं ?
गांव परींचें जवळी वदती,
काजवेच ज्या उजेड देती,
दोन जादुच्या कलिका फुलती;
आलि तेथोनी   चुंबाया बालक नयनीं !

कुठुनी हंसुं आलें   झोपेंत अधरिं जें फुललें !
म्हणति बिजेच्या इंदूचा कर,
आलिंगी कमलिनीस सुंदर,
तरंग जे तइं येति मुखावर
वाहत आले   बाळाच्या वदनीं खुलले !

कोठुनी आली   टवटवि ही अंगावरली ?
माता जेव्हां मुग्धा युवती,
हीच मृदुलता तीचे चित्तीं,
प्रीतीच्या रूपें होती ती;
तेथुनी आली   बाळाच्या अंगीं भरली !



# जाईचीं फुलें.

( चालः–तरुण कुलिन गोरा. )

मधुर जातिसुमनें ! मनोहर, धवल जातिसुमनें !
तीं अजुनी स्मरतीं करिं जीं धरिलीं
शैशविं पहिल्यानें. ॥ ध्रु. ॥

ही सुरम्य सरिता मंजुलकलनादिनी,
नभ रवि–कर–रंजित, धरा शस्यशालिनी
तिमिराचा बुरखा दूर करें सारुनी
प्रियकरा भेटण्या उत्सुक रात्रिला मनीं
हीं मन मम वेधितीं, पाहतां हीं मन मम वेधितीं !
परि मधुर वाटतें बालपणांतिल
जातिफुलांची स्मृति.

किति उत्सवरंगीं दंग मती जाहली,
किति सुरम्य कालीं गाणीं नव गाइलीं.
किति बकुलमालिका गळां मुदें घातली
जी प्रेमभरानें कांतेनें गुंफिली.
तरी जातिसुमनें ! मनोहर गमति. जातिसुमनें
तीं अजुनी स्मरतीं करिं जीं धरिलीं
शैशविं पहिल्यानें !

# दुष्ट डाकवाला.

( चालः-चंद्रकांतरायाची कन्या. )

जमीनीवरी स्तब्ध अशी कां आई ! बसलीस ?
खिडकींतुनि अंगावर तुझिया पडतो पाऊस.
वसन भिजुनि चाललें त्याकडे लक्ष तुझें नाहीं !
चार वाजले दादा आतां शाळेंतुनि येई-
अशी काय दिसतेस पण- तुला काय तरी झालें ?
बाबाकडुनी पत्र काय तुज आज नसें आलें ?
लटकावुनि काखेंत सकाळीं पिशवि डाकवाला
सर्वांनां वांटीत चालला पत्रें मज दिसला;
बाबांचीं तेवढीं ठेवुनी पत्रें तो घेतो
स्वतांच वाचायास्तव, मजला दुष्टच गमतो तो.
म्हणुनी वाइट वाटुन घेऊं नकोस तूं आई ?
उद्यां असे बाजार जवळच्या गांवीं गे पाही;
आणव तेथुनि कागद शाई बाईच्याकडुनी,
मीच लिहिन बाबांचीं पत्रें तुझियास्तव जननी !
'श्रीग' पासुनि 'त-थ' सुद्धां लिहीन मी सारीं
पहा अक्षरें त्यांत एकही चूक नसेल परी
हंसशि काय पण ?-बाबाऐशीं पत्रें सुंदरशीं
मला लिहाया येति न ऐसें वाटे का तुजशी ?

पण मी आंखुन घेइन माझा कागद काळजिनें
सुंदर मोठीं छान अक्षरें काढिन बेतानें.
दुष्ट डाकवाल्याच्या पिशवींत त्या बाबाऐशी
लिहून झाल्यावर टाकिन मी गमतें का तुजशीं !
मुळिं न थांबतां स्वतांच आणिन मी तुझियाजवळी
एक एक अक्षरें वाचण्या तुजला मदत करी.
सुंदर पत्रें तुजला देणें नच अवडे त्याला.
खरोखरिच वाटतो मला तो दुष्ट डाकवाला !



# पाऊस.

( चालः—भूपती खरे ते वैभव. )

गगनांत मेघ हे भीषण बघ किति जमले
तूं जाउं नको बाहेर बाळ ! या वेळे. ॥ ध्रु. ॥

बघ सरसरतींच्या वाऱ्यानें तरुपंक्ति
निज शीर्षें एकामेकांवरि आपटती;
घरट्यांचा आश्रय घेतः खगकुलें,
किलबिलणें त्यांचें सारें लोपलें;
बघ उपवन अगदीं शांत जाहलें,
किति नदीतीरही उदास होउनि गेलें !
तूं जाउं नको बाहेर बाळ या वेळे.

परड्यांत हंबरे मोठ्यानें किति कपिला,
गोठ्यांत आणुनी थांब बांधितों तिजला;
शेतांत सांचलें बघ गुढघाभर पाणी.
बांध नीट करण्या गेले तिकडे कोणी,
मार्गांत वाहतें पाणी खळखळा,
जणुं बाळ खोडकर वाटे तें मला !
मातेच्या करुनी कांहीं खोडिला,
रागावलि बघुनी धावत खिद्ळत सुटलें !
तूं जाउं नको बाहेर बाळ या वेळे.

कुणि पाणोथ्यावर नावाड्यातें बाही,
तिमिरांत अशा चालेल नाव पण केवी ?

पर्जन्य अश्व जणुं तुफान सुटला वाटे !
आरोहुनि त्यावर वेगानें नभ फिरतें !
फोफावत सरिता वेगें चालली;
घाटावर युवती पाण्या पातली
किति भयाभीत पाहोनी जाहली;
झडकरी भरोनी घडा, त्वरें गृहिं चाले,
तूं जाउं नको बाहेर बाळ या वेळे.

निसरेल पाय तरि कोणाचा वाटेंत,
लावुं दे म्हणुनिया दीप मला झाणिं तेथ;
शुकशुकाट गमतो अगदीं बाजारांत !
चहुंकडे पसरली भीषणता जगतांत !
वेणुच्या वनामधिं वायू शिरतसे
गोंगाट केवढा तेथें करितसे.
कीं श्वापद अडके जाळीं बघ जसें !
धडपडे ओरडे तेवी याचे चाळे
तूं जाउं नको बाहेर बाळ या वेळे.



# भेट.

( चालः—अंजनी गीत. )

माझी अठवण रहावयास्तव
भेट ही मुला! जवळी ठेव,
जगप्रवाही वाहत आहों   आपण रे जीव.

परस्परातें सोडुनि दूरी
जाऊं, विसरूं प्रेम सत्वरी,
जड भेटीनें हृदयबद्ध हो,   आशा मी न करीं.

तूं नुकते फुलणारें फूल
मार्ग आक्रमायाचा फार
प्रेम आमुचें घुटकन् पिउनी   जाशिल तर दूर,

खेळगड्यांशीं खेळ चालले
हृदय तुझें त्यांमधें रंगलें,
ठाव नसे जर आम्हां तेथें   नवल तरी कसलें?

काळ रिकामा अमुच्यापुढती
गत बाळांची करोनी स्मृति
करीत बसणें शोक राहिलें   अमुच्या रे हातीं!

उड्या मारुनी कड्यावरोनी
गात चालली नाचत तटिनी,
प्रेमें गिरि तिजकडे बसे परि   दृष्टी लावोनी.

# शाहणा.

( चालः-साकी. )

आइ ग माझे ! बाळ तुझी ही अगदीं वेडी आहे;
दीप तारका यांतिल अंतर न कळे तिजला पाहे !
लटूपटीच्या खेळीं करितां खापरिचा सैंपाक,
तिला वाटतो खराच लागे खायाला ती देख !
अंकलिपी देऊन तिला मी श्री-ग शिकवुं पहात
फाडुनि हंसते मोठ्यानें ही शिकावयाची रीत ?
' द्वाडे ' म्हणुनी रागें बघतां वटारून मी डोळे,
हंसूं लागते; तिला वाटते गंमत कसली न कळे.
' बाबा ' म्हणतां खेळीं, ठाउक बाहिर जरि ते गेले
आले जवळी वाटुनि बघते वरती करुनी डोळे !
कुत्रीचीं आपुल्या जमवुनी पिलेंच भरवी शाळा,
'मास्तर' होतो स्वयें मी तरी 'दादा' म्हणते मजला !
हात करोनी उंच नभांतिल चांदोबा धरुं पाहे !
आइ ग माझे ! बाळ तुझी ही अगदीं वेडी आहे !



# चाफ्याचें फूल.

( चालः—उद्धवा शांतवन. )

चंपक-सुम जर मी झालों गंमत तर किति होईल ! ध्रु०

मृदु हसेन वाऱ्यासंगें तरुशाखाग्रीं बैसून,
ओळखशिल का तूं मजला नव पल्लविं मी नाचेन,
'जाशी तूं कोठें बाळा'
मारशील हाका मजला,
देईन 'ओ' न तरि तुजला;
हांसेन मनीं बहुसाल.

न्हालीस म्हणुनिया स्कंधीं मोकळे केश सोडून
पाहीन काम करितांनां पाकळ्या हळुच उघडून;
जाशील अंगणीं जेव्हां चाफ्याच्या छायेंतून
माझा तुज येइल वास,
देइल सुख तव हृदयास,
येईल मला किति हास !
कांहिं न परि तुज उमगेल.

रामायण खिडकीमाजी वाचतेस रोज बसून,
छाया तइं चंपक तरुची अंगावर पडेल छान,
साउली इवलिशी माझी पुस्तकावरी पाडीन

वाचशील त्याच ठिकाणीं;
ती बाळाची समजोनी
येईल काय तुज जननी !
गंमत तर किति होईल !

घेउनी दीप सांजेला   जातेस जइं गोठ्यांत,
मारुनी उडी तरुवरुनी   सहसा तव बालक होत,
बोलेन ओढुनी ओचा   आई ! मज सांगे गोष्ट.
'होतास कुठें द्वाडा रे !
शोधुनि मी तुजला थकलें,'
'सांगेन न तुज या वेळे.'
बोलूं आपण हे बोल.



REFBK-0001822
REFBK-0001822

# आशीर्वाद.

—— : ० : ——

( चालः—कवणें तुज गांजियलें. )

आशीर्वच वितरी या विमल बालकीं
स्वर्भूची भेट तयें घडविली निकी !
अवडे त्या एवढेंच
जननी-मुख इंदु-तेज,
धूळ तिरस्कारि न तो,
सोन्यापाठि न पळतो,
धर हृदयीं ठेवि तुझा हस्त मस्तकीं.
दुर्गम जगतांत अशा आज पातला,
न कळे तव दारिं उभा केंवि राहिला !
सुदृढ तुझा धरुनि हात
पुसतो तुज पुढिल वाट.
हांसत तुज मागोनी
येइल निःशंकपणीं;
राखी विश्वास नीट नेइं त्यास कीं.
आठवुनी प्रभु हृदयीं दृढ तया धरी,
क्षुब्ध जलधि रत्न हरिल तस्करापरी !
स्वर्गीचा पवन अजुनि
नेइल तव नाव तरुनि
पैलतिरीं आण मनीं,
जाउं नको त्या विसरुनि
घाइंत, तो जाण तुझा मोक्ष होइ कीं !